क्रमांक नाजिग्रा /डी ३४/१६५६/२०११
कार्यालय पोलीस अधीक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक : ०५.०४.२०११

## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

### मंदीर चोरी

१. पो.स्टे. सावनेर :—

दिनांक ०३/०४.०४.२०११ चे रात्री दरम्यान मौजा सावनेर वार्ड क्रमांक ११ येथे असलेल्या दुर्गा मंदीराचे चॅनल गेटचे कुलूप तोडुन मंदीरात प्रवेश करून दानपेटीतील चिल्लर, नगदी ३०००/—रू. व देविचे चांदीचे छत्र किंमती ३०००/—रू. असा एकुण ६०००/—रू. चा माल अज्ञात आरोपीने चोरून नेला. सदर प्रकरणी फिर्यादी नामे नरेंन्द्र रविजितसिंग बघेल वय ४४ रा.सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे सावनेर ला क. ३७९ भादवि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास एएसआय ११९७ डफरे करित आहे.

### मालाची अफरातफर करणा—या आरोपीला अटक

१. पो.स्टे. बोरी :—

दिनांक १३.०३.२०११ ते ०२.०४.२०११ दरम्यान मौजा निक्को कंपनी एमआयडीसी बोरी येथे आरोपी नामे अरूण प्रभाकर नन्नावरे वय ३० रा.रूईखैरी हे वरील नमुद कंपनीमध्ये फ्रॅटलींग इन्चार्ज असुन कंपनीचा कॉस्टींगचा माल आरोपीकडे फिनीशिंग करिता पाठविल्या जातो. घटनेदिवशी फिर्यादीने आरोपीकडे एकुण १०० नग कॉस्टींग एकुण किंमती ४,५०,०००/—रू.चा माल फिनीशींग करिता पाठविले असता त्या संपुर्ण मालाची आरोपीने अफरातफर केली. सदर प्रकरणी फिर्यादी नामे योगेशसिंह कप्तानसिंह चौधरी वय ३२ रा.पालीवार नगर बोरी (फ्रॅटलींग इन्चार्ज) यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी ला क. ४०६, ४०७ भादवि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीला अटक करण्यात आली. सदर गुन्हंयाचा पुढील तपास पोहवा ८८६ देविदास करित आहे.

### फसवणुक

१. पो.स्टे. कुही :—

दिनांक ०४.०४.२०११ चे पूर्वी पासुन मौजा पवनपुत्र नगर गोधनी सिम नरसाळा येथे आरोपी नामे सौ. पुष्पा ईश्वर गभणे, २.सौ.बबीता प्रदीपलाल शाहु, ३.ललिता भैयालाल शाहु, ४.प्रदीप भैयालाल शाहु सर्व रा. मौजा पवनपुत्र नगर गोधनी सिम नरसाळा यांनी संगनमत करून फिर्यादी नामे ग.भा.रेखा मनोहर खोपडे वय ४० रा.जुनी शुक्रवारी नागपूर हिचे पती अविवाहीत मरण पावले व त्याचे कोणी वारसदार नाही असे दर्शवुन आरोपी क्रमांक १ हिने फिर्यादीचे मौजा गोधनीसिम नरसाळा येथे असलेला प्लॉट आरोपी क्रमांक २ हिचे नावाने रजिस्ट्री करून दिल्याने फिर्यादी व तिचे मुली नामे १.प्रणाली मनोहरराव खोपडे वय १८, २. दिपाली मनोहरराव खोपडे वय १५, ३. शितल मनोहरराव खोपडे वय १० यांची वरील सर्व आरोपींनी फसवणुक केली. सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही ला क. ४२०, ३४ भादवि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास एएसआय ६८७ शंकर करित आहे.

### अपघातात मृत्यु

१. पो.स्टे. मौदा :—

दिनांक ०३.०४.२०११ चे १९.३० वाजता दरम्यान नागपूर ते भंडारा रोडवर मौजा कडोली शिवार येथे अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन वरील नमुद ठिकाणी अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष यांना धडक मारून त्यांचे जागीच मरणास कारणीभुत झाला. सदर प्रकरणी पो.स्टे. मौदा ला कलम २७९, ३०४अ भादवि. सह कलम १८४ मोवाका. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा १०३० गजानन करित आहे.

२. पो.स्टे. जलालखेडा :—

दिनांक ०४.०४.२०११ चे २१.०० वाजता दरम्यान मौजा पेठ मुक्तापूर कडुन आमनेर कडे जाणारा ट्रॅक्टर क्रमांक एमएच—२७/एल—३४७१ च्या चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन वरील नमुद ठिकाणी रोडवर खेळत असलेला मृतक नामे समीर सुरेश भवराळ वय १५ यास धडक मारून त्याचे जागीच मरणास कारणीभुत झाला.सदर प्रकरणी फिर्यादी नामे सुरेश पंजाबराव भवराळ वय ३५ यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा ला कलम २७९, ३०४अ भादवि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास एएसआय १२९५ अशोक मांढरे करित आहे.

३. पो.स्टे. केळवद :—

दिनांक ०३.०४.२०११ चे रात्री दरम्यान नागपूर ते सावनेर रोडवर मौजा केळवद शिवार येथे अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन वरील नमुद ठिकाणी मृतक अनोळखी ईसम वय अंदाजे २५ यांना धडक मारून त्याचे जागीच मरणास कारणीभुत झाला. सदर प्रकरणी पो.स्टे. केळवद ला कलम २७९, ३०४अ भादवि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ६३१ जगदीश ठाकुर करित आहे.

## अपघात

१. पो.स्टे. कळमेश्वर :—

दिनांक ०४.०४.२०११ चे ०९.०० वाजता दरम्यान कळमेश्वर टावुन येथे स्कुटर क्रमांक एमएच—३१/सीजे—९८८० चा चालक फिर्यादी नामे कैलाश रामनिहोर कुशवाह वय २४ रा.रामदेव तलाव रामचौक ता.देहगंज जि.शिवनी मध्य प्रदेश ह.मु.दहेगांव हे कळमेश्वर कडुन ब्राम्हणी फाटाकडे जात असता रेल्वेस्टेशन कडुन क्षिरभाते सभागृहकडे जाणा—या ट्रक क्रमांक एमएच—३१/सीक्यु—८८८९ च्या चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन वरील नमुद ठिकाणी फिर्यादीचे स्कुटरला धडक मारून फिर्यादीला जख्मी करण्यास कारणीभुत झाला.सदर प्रकरणी जख्मी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर ला कलम २७९, ३३७ भादवि. सह कलम १८४ मोवाका. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास एएआय १५९५ रमेश येलेकर करित आहे.

२. पो.स्टे. देवलापार :—

दिनांक ०४.०४.२०११ चे १७.०० वाजता दरम्यान नागपूर ते जबलपूर रोडवर मौजा हरणाकुंड शिवार येथे बोलेरो ॲम्बुलन्स क्रमांक एमएच—३१/सीक्यु—८९२६ चा चालक गरीबदास भावेकर रा.विजयपाणी जि.शिवनी मध्य प्रदेश हे नागपूर वरूण मंडपा कडे पेशंट नामे सुवर्णदास छैरवाल यांना घेवुन जात असतांना आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन वरील नमुद ठिकाणी आपले वाहन टर्निंगवर रोडच्या खाली उतरविल्याने अपघात झाल्याने बोलेरो ॲम्बुलन्स मध्ये बसलेले फिर्यादी नामे जलेश्वरदास महुदास सारवे वय ४० व सौ.लिलाबाई खैरवाल दोन्ही रा.चिंपली ता.कवडा जि.कबीरधाम छत्तीसगढ यांना जख्मी करण्यास व स्वत: जख्मी होण्यास कारणीभुत झाला.जख्मींना उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय देवलापार येथे भरती करण्यात आले.सदर प्रकरणी जख्मी फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. देवलापार ला कलम २७९, ३३७ भादवि. सह कलम १८४ मोवाका. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राठोड करित आहे.

## अकस्मात मृत्यु

१. पो.स्टे. कळमेश्वर :—

दिनांक ०४.०४.२०११ चे १३.३० वाजता दरम्यान मौजा ढगा शिवार येथील मृतक नामे अनोळखी इसम नामे वय ६० यांचे पोटाचे आजाराने पेट जास्त दुखत असल्याने फिर्यादीचे शेतातील कोठयात गेले असता फिर्यादीने त्यांना नाव, गांव विचारले परंतु मृतकाला पोटाचा जास्तच त्रास वाढल्याने ते काही न सांगता मरण पावले. सदर प्रकरणी फिर्यादी नामे आनंदराव जयराम साटे वय ३६ रा.बाजारगांव यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ प्रमाणे मर्ग दाखल करण्यात आला असुन मर्ग चा पुढील तपास पोहवा ११८८ बिजेन्द्र करित आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपूर